मोटार अपघात दावा अर्ज क्र. ३१/२०१६,
निलेश - वि - मे. ईगल कंस्ट्रक्शन कंपनी व इतर.

निशाणी क्र.५ खालील आदेश.
(दि. ०५.१०.२०१७)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मोटार वाहन कायद्याचे कलम १४० अन्वये अंतरीम नुकसान भरपाईसाठी दाखल केला आहे. अर्जदार हे स्वतः यातील जखमी व्यक्ती आहेत.

२. सामनेवाला क्र.१ हे अपघातग्रस्त वाहन टाटा टिप्पर क्र. एमएच २८ बी ८४५६ चे मालक आहेत. त्यांना प्रस्तुत दावा अर्जाची नोटीस निशाणी ९ अन्वये पाठविण्यात आली होती. तरीसुध्दा ते या न्यायालयामध्ये हजर राहिले नाहीत. त्यांचेविरुध्द प्रस्तुत प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. ०४.०८.२०१६ रोजी निशाणी १ वर पारित झालेला आहे. सामनेवाला क्र.१ हे सदर वाहनाचे मालक आहेत, हे दाखविण्यासाठी अर्जदार यांनी निशाणी ४/५ सोबत सदर वाहनाच्या नोंदणी पुस्तकाचे प्रमाणपत्र दाखल केले आहे.

३. सामनेवाला क्र.२ ही विमा कंपनी असून त्यांनी त्यांची कैफीयत निशाणी १४ अन्वये दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी अपघातग्रस्त वाहनाचा विमा त्यांचेकडे उतरविला होता ही बाब स्पष्टपणे मान्य केली नसली तरी आजरोजी त्यांचेतर्फे विद्यमान वकील श्री डी. एस. चव्हाण यांनी अपघातग्रस्त वाहन त्यांचेकडे विमाकृत होते असे न्यायालयासमोर निवेदन केले.

४. अर्जदार यांनी दि. २७.०३.२०१५ रोजी अपघात झाला, हे दाखविण्याकरिता गुन्हयाची पहिली वर्दी व घटनास्थळ पंचनामा व अंतिम अहवाल, इत्यादी दाखल केले आहेत. त्यांचे अवलोकन केले असता अपघातग्रस्त वाहन टाटा टिप्पर क्र. एमएच २८ बी ८४५६ चा सहभाग प्रथमदर्शनी अपघातामध्ये दिसून येतो.

५. अर्जदार यांनी दाखल केलेल्या विमापत्राच्या प्रतीवरुन असे दिसून येते की अपघातग्रस्त वाहन हे दि. १८.०५.२०१४ ते १७.०५.२०१५ या कालावधीमध्ये त्यांचेकडे विमाकृत होते.

६. अर्जदार यांनी अपघातामध्ये त्यांना जखमा झाल्या, हे दाखविण्याकरिता

श्रीराम हॉस्पीटल यांनी दिलेले दि. २९.०३.२०१५ चे प्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच अपघातात झालेल्या जखमांमुळे त्यांना कायमचे अपंगत्व आले, हे दाखविण्याकरिता डॉ. विजय वाघ यांचे प्रमाणपत्र फॉर्म कॉम्प 'बी' मध्ये दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की अर्जदार यास ३० टक्के कायमचे अपंगत्व आलेले आहे.

७. अर्जदार यांनी अंतरीम नुकसान भरपाई मिळण्याकरिता आवश्यक असणा-या सर्व गोष्टी न्यायालयासमोर आणल्या आहेत. सबब अर्जदार हे मोटार वाहन कायद्याचे कलम १४० कलमान्वये नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

## आदेश

१. निशाणी ५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी वैयक्तीकरित्या व संयुक्तरित्या अर्जदार यांना रक्कम रु. २५,०००/- (रु. पंचेवीस हजार) अंतरीम नुकसान भरपाई म्हणून द्यावेत.

३. सामनेवाला क्र.१ व २ यांनी सदर रकमेचा अर्जदार यांचे नांवे रेखांकीत धनादेश काढून तो या न्यायालयात आजपासून ३० दिवसांचे आंत जमा करावा व त्यानंतर तो अर्जदार यांना देण्यात यावा.

४. सदर आदेशाचे पालन न झाल्यास, सामनेवाला क्र.१ व २ हे सदर रकमेवर हुकूमनामा झाल्याच्या दिनांकापासून ८ टक्के द.सा.द.शे. व्याज अर्जदार यांना देण्यास बांधील राहतील.

५. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

स्वा.
(श्रीमती सु.सु. कोसमकर)
सदस्या,
मोटार अपघात दावे न्यायाधिकरण,
बुलडाणा.

दि. ०५.१०.२०१७.

...

## प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, हया पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव - ज्ञा.वि. गायकी, लघुलेखक निम्न श्रेणी,

न्यायालयाचे नांव - सदस्य, मोटार अपघात दावे न्यायाधिकरण, बुलडाणा.

आदेशाचा दिनांक - ०५.१०.२०१७.

आदेश अपलोड केल्याचा दिनांक - ०६.१०.२०१७.

...